**कि.फौ.अ.क्र. ३३/२०२२**
**निशाणी क्र. ३६ च्या पुढे**

**<u>उलटतपास जाबदेणार यांचे वकील श्री. एच. डी. नरूटे यांचेमार्फत शपथेवर सुरू</u>**

मी साखर कारखान्यामध्ये नोकरी करतो. मी माझ्या लग्नापूर्वी साखर कारखान्याच्या कॉलनीमध्ये राहणेस होतो. मला तीन मुले आहेत. मी माझे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र किती तारखेला दाखल केले हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझा भाऊ संतोष विघ्ने शेती करतो. आमची संपूर्ण शेती ११ एकर आहे. शेतामध्ये ऊस, कापूस, गहू, मका इत्यादी पिके घेतो. आमचेकडे दोन जनावरे आहेत. कारखान्यापासून माझे घर ३५ किमी अंतरावर आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी दुध विकत घेतो. तीन पाळीमध्ये कारखान्याचे काम चालते.

अर्जदार व सामनेवाला क्र. १ यांच्या लग्नाचा संपूर्ण खर्च मी केला हे दाखविण्याकरिता अभिलेखावर कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही. अर्जदार घरामध्ये कामधंदा करत नव्हती व भांडण तंटा करते याबाबत मी स्वत: तिचेविरूध्द तक्रार दिली नव्हती. कोणत्या तारखेला सामनेवाला क्र. १ याने अर्जदारास नांदविणेस नेण्याचा प्रयत्न केला हे मी सांगू शकत नाही. अर्जदार शिवणकाम करत असून ती दुध व्यवसाय देखील करते हे दाखविणेकरिता कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. अर्जदार शिवणकाम करते किंवा कसे हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या सरतपासातील मजकूर माझे परस्पर वकीलांनी माझ्या भावाला मदत व्हावी याकरिता तयार केला होता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

माझे समक्ष व श्रवणोत्तर स्विकृत,

स्वाक्षरी/—
(एस. बी. लेंडवे)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, इंदापूर.

ठिकाण इंदापूर
दिनांक १४/०८/२०२५